FORM-1A

N.C.R.B. 00

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि., पहिली खबर क्र. ०३, वर्ष २०१८, दिनांक १८/०१/२०१८
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधिनियम १९८८, कलमे Sections ७, १३(१)(ड) सह १३(२)
(ii) अधिनियम Act ..., कलमे Sections ...
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना : वार शुक्रवार, तारीख पासून १८/०१/१८ वेळ १२:२०, तारीख पर्यंत १८/०१/१८, वेळ १२:४४
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख १८/०१/२०१८, वेळ १४:३०
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेल्या सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. २८/२०१८, तारीख १८/०१/१८ वेळ १५:३०
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा पश्चिमेस, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ...
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव, ठिकाणाचे नंबर, गल्ली, रस्त्याचे नाव: जी/दक्षिण वार्ड, मनपा, मधील दुकाने व आस्थापना विभाग
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण धनमिल नाका, ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल क्र.नं.१३., गाव ..., पोस्ट ..., तालुका ..., जिल्हा ..., राज्य ...
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ..., तालुका ..., जिल्हा ..., राज्य ...
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name राकेश जैन (b) वडिलांचे / पतीचे नाव शांतलाल जैन
Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय १४/०३/१९८४ (३३ वर्षे) (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ९३२१३२८९८६ / ९३२१३१३०३०
Date of Birth and Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ..., दिल्याचा दिनांक ..., दिल्याचे ठिकाण ..., (f) व्यवसाय ...
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदू, जात Caste जैन, जनजात Sub-Caste ...
(h) पत्ता ..., गल्ली / सर्व्हे नं. ..., घर / नाव नं. ३०१/३०२ जय गुरुकृपा को.ऑ.सो., फोन / मो. नं. ..., पॅन नं. ..., वोटर्स नं. ...
Address : Ward House No./Name No. Phone/M. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव स्वा.क्र., जवळचे प्रसिद्ध ठिकाण मालाड (प), गाव ..., पोस्ट ..., पो. स्टे. ...
Road Nearest Identifiable place Village Post P. Stn.
तालुका ..., जिल्हा ठाणे, राज्य ..., सध्याचा पत्ता ...
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
१) संदिप कमलाकर कामेकर, हि. वय ४५ वर्षे, निरिक्षक (दुकाने व आस्थापना)
२) श्रीमती विना विजय मेस्त्री, हि वय ५३ वर्षे, वरिष्ठ निरिक्षक (दुकाने आस्थापना)
दोन्ही नेमणूक जी/दक्षिण वार्ड, म.न.पा. कार्यालय, मुंबई.

92

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे तात्काळ
Reasons for delay in reporting by the Complainant/Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.
रु. ५००/- दराच्या ८ भारतीय चलनी नोटा

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य रु. ४०००/- किंमतीच्या
Total Value of properties stolen / involved
(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.
नमुद तारिख, वेळ व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी त्यांचे अशिल यांचा हॉटेल परवाना मिळविण्याकरीता ऑनलाइन अर्ज भरला होता सदर अर्जाची चौकशी करण्याकरीता फिर्यादी हे आज रोजी महानगर पालिका जी/दक्षिण वॉर्ड मधिल दुकान व आस्थापना विभागात गेले असता सदर कार्यालयातील आलोसे क्र.१ व २ यांनी परवाना देण्याकरीता फिर्यादी यांच्याकडे रु. ५,०००/- लाचेची मागणी केली व तडजोडी अंती आलोसे क्र.१ यांनी फिर्यादी यांच्याकडे रु. ४०००/- ची मागणी करुन ती स्विकारली म्हणून क. ७, १३(१)(३) सह १३(२) भ्र.प्र.का. १९८८ प्रमाणे गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरुन कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
........................................
2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
........................................
3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :
(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)............ Rank............ No. ............ to take up the Investigation or
(2) Refused Investigation due to............ (3) Transferred to P. S. ............ District............ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ Informant, free of cost.
(R.O.A.C.)

INSPECTOR OF POLICE
सत्यमेव जयते
MUMBAI
ANTI-CORRUPTION BUREAU

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name मनोज विलास गुजर
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ............
Posting
Code No. of I. O. ............

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख............
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

फिर्याद दिनांक १९/०१/२०१८

श्री. राकेश शंकरलाल जैन, वय ३३ वर्षे, शिक्षण:- एम.बी.ए. धंदा-व्यवसाय, (सुविधा केंद्र, शांती शॉपिंग सेंटर, मिरा रोड स्टेशन समोर, मिरा रोड, जिल्हा ठाणे), राठि- ३०१ व ३०२, जय गुरुकृपा, खाऊ गल्ली, भाईंदर, पश्चिम, जि ठाणे पिन कोड क्र. ४०११०१ मोबाईल क्र. ९३२१३२६९८६ व ९३२१३१३०३०....

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमूद ठिकाणी गेल्या ०५ वर्षापासून माझे आईवडील, भाऊ, पत्नी व दोन मुलांसह राहत आहे. मी ऑन लाईन सर्व्हिस व मेटल पुरवठा हा व्यवसाय करतो व सदर व्यवसायातून मिळणाऱ्या मोबदल्यामधून माझे कुटुंबियाचा उदरनिर्वाह करीत असतो.

मी ऑन लाईन व्यवसायमध्ये पासपोर्ट, लग्नाचा दाखला, गुमस्ता परवाना व इतर विविध शासकिय विभागातीचे परवाने ऑन लाईन भरुन विविध संबंधीत ठिकाणाचे आस्थापनात सादर करतो व त्यांचशी समन्वय साधून माझ्याकडे येणाऱ्या क्लाइंटच्या आवश्यकतेप्रमाणे त्यांना दाखले किंवा परवाने मिळवून देवून त्याकरीता आवश्यक तो मोबदला घेतो. अशाच प्रकारे व्यक्ति नामे श्री. देंवेद्र रमेश शामला (मो. क्र. ९९६७२९१८३७), वय ३५, रा.ठि.-बी-५०२, सिल्वर बस अपार्टमेंट, आय. एम. रोड, शगुन हॉटेल जवळ, दहिसर, पश्चिम, मुंबई हे दि. ०८/१२/२०१७ रोजी माझे मिरा रोड येथील कार्यालयात आले व त्यांचे वडील श्री. एस. व्ही. रमेश यांचे नावे एम/४८, जिजामाता नगर, डॉ. मोजेस रोड, वरळी, मुंबई १८ चा ठिकाणी त्यांची जागा असुन सदर पत्यावर त्यांची पत्नी नामे सौ. ममता देंवेद्र शामला हिचे नावे Food Land Aroma या नावाने घरगुती खानावळ व जेवणाचे पार्सल देण्याचे काम चालु करावयाचे असल्याने त्याकरीता गुमस्ता परवान्याची आवश्यकता असल्याने तो गुमस्ता परवाना काढणसाठी ते आले असल्याचे सांगितले. त्यांनी त्यांचे सोबत आणलेली कादगपत्रे स्कॅन करुन सौ. ममता शामला याचे नावे महानगर पालिकेच्या mcgm.gov.in या ऑन लाईन संकेतस्थळावर जावून गुमस्ता परवाना मिळण्याकरीता विहित नमुन्याप्रमाणे अर्ज भरला. त्याच बरोबर ऑन लाईन रु. ६८०/- ऐवढा शुल्क देखील भरला व त्याना रु. २०००/- ची पावती दिली.

दि. ०८/१२/२०१७ रोजी ऑन लाईन अर्ज सादर केल्यानंतर दि. २७/१२/२०१७ रोजी माझ्या ई-मेल वर सौ. ममता देंवेद्र शामला याचे भरलेल्या अर्जाबाबत एम/४८, जिजामाता नगर, डॉ. मोजेस रोड, वरळी, मुंबई १८ या ठिकाणाचे विद्युत बिलावर असलेले नाव श्री. एस. व्ही. रमेश यांचे ''ना हरकत प्रमाणपत्र'' किंवा घर भाडेतत्वावर घेतले असल्याबाबतचा करारनामा सादर करण्याबाबत मेल प्राप्त झाला. मी दि. १८/०१/२०१८ रोजी देवेंद्र शामला यांचे वडील श्री. एस. व्ही. रमेश यांचे एम/४८, जिजामाता नगर, डॉ. मोजेस रोड, वरळी, मुंबई १८ या ठिकाणी घरगुती खानावळ चालविण्यास परवानगी असल्या बाबतचे ''नाहरकत प्रमाणपत्र'' ऑन लाईन मनपा कार्यालय, जी/दक्षिण विभाग यांचे संकेतस्थळावर अपलोड केला.

दि.१८.१.२०१८ रोजी त्रुटीपुतर्ता करुन सादर केलेल्या अर्जावर काय कार्यवाही झाली? याची माहिती घेण्याकरीता मी दुपारी १२.३० वाजण्याचे सुमारास मनपा कार्यालय, जी/दक्षिण विभाग, दुसरा माळा, दुकाने व आस्थापना, मुंबई या विभागास भेट देवून डॉ. 'ई' मोजेस रोड येथील मनपा अधिकारी कोण आहेत? याबाबत चौकशी केली असता, मला तेथील हजर असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी

समक्ष

(मनोज गुजर)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

20/1/18

एका व्यक्तिने दुकान व आस्थापना मध्ये कार्यरत असलेल्या एका संदिप नावाचे निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याकडे जावून भेट घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी नमुद निरीक्षक अधिकाऱ्याकडे जावून त्यांची भेट घेवून ऑनलाईन भरलेल्या अर्जाबाबत चौकशी केली असता, सदर निरीक्षक अधिकारी यानी मला विविध आस्थापनाच्या परवानग्यासह अग्नी सुरक्षा व अग्नी प्रतिबंध या करीता आवश्यक असलेला परवाना आणण्यास सांगितला. त्यावेळी मी त्यांना अग्नी सुरक्षा व अग्नी प्रतिबंध संदर्भातील परवाना हा अग्निशामक दलाच्या कार्यालयातून आणून देतो असे सांगितले. त्यावेळी नमुद निरीक्षक अधिकारी यांनी माझे काम करुन घ्याचचे असल्यास माझ्याकडे पैशांची मागणी करुन १०००/२००० हजार रुपयांमध्ये काम होणार नाही असे सांगितले. त्या वेळी मी त्यांना परवाना प्राप्त करण्याकरीता किती पैसे द्यावे लागतील याबाबत विचारणा केली असता, त्यांनी ज्या व्यक्तिने ऑनलाईन अर्ज सादर केलेला आहे, त्या व्यक्ति/पार्टीस समक्ष घेवून येण्यास सांगितले. माझी नमुद लोकसेवक अधिकारी यास लाच देण्याची इच्छा नसल्याने मी ''जस्ट डायल'' या वेबसाईटवर जावून मोबाईलवरुन फोन करुन ॲन्टी करप्शन विभागाचा नंबर प्राप्त केला. त्यावरुन मी ॲन्टी करप्शन विभाग येथे संपर्क साधला असता, मला ॲन्टी करप्शन, वरळी, मुंबई येथील कार्यालयाचा पत्ता देण्यात आला. त्याप्रमाणे मी लागलीच ॲन्टी करप्शन ब्युरो, वरळी, मुंबई येथे येवून तेथील वरिष्ठ अधिकारी यांना भेटून मनपा कार्यालय, जी/दक्षिण विभागाचे दुकान व आस्थापना विभागाचे निरीक्षक संदिप नावाचे निरीक्षक अधिकारी हे दुकान व आस्थापना गुमस्ता परवाना देण्यासाठी माझेकडे लाचेची मागणी करीत असल्याबाबत लेखी तक्रार दिली.

त्यानंतर माझी तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील पो.नि.मनोज गुजर यांचेकडे देण्यात आली. माझ्या तक्रारीची पो.नि.मनोज गुजर यांनी तात्काळ दखल घेवून दोन शासकिय पंचाना ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात हजर राहण्याबाबत संदेश दिला. तसेच माझी ओळख सहाय्यक पोलीस आयुक्त श्रीमती अलका देशमुख यांचेशी करुन दिली. त्यानंतर लागलीच माझे तक्रारीचे अनुषंगाने पडताळणीचे आयोजन करण्यात येवून दोन शासकिय पंच ॲन्टी करप्शन कार्यालयात आल्यावर माझी ओळख पडताळणी पोलीस पथकाशी ओळख करून दिली. पो.नि.गुजर यांनी त्यांच्या ताब्यात असलेला माझा तक्रार अर्ज पंचासमक्ष वाचून माझी तक्रार पंचांना थोडक्यात समजावुन सांगितली व पंचानी माझा तक्रार अर्ज वाचुन स्वतःच्या स्वाक्षऱ्या केल्यानंतर पो.नि. मनोज गुजर यांनी त्यावर समक्ष म्हणुन स्वतःची स्वाक्षरी केली व पुढील कारवाईकरीता स्वतःच्या ताब्यात घेतला. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील गोपनीय कक्षात माझे तसेच पंचाचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरवर वक्तव्य घेण्यात आले. तसेच पो.नि.मनोज गुजर यांनी मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता महानगर पालिका कार्यालय, जी/दक्षिण विभाग, दुकाने व आस्थापना विभाग, मुंबई येथे पंच व पोलीस पथकासमवेत शासकिय वाहनाने आलो असता, नमुद कार्यालय हे बंद झाल्याचे आढळून आले. त्यावेळी पो.नि.गुजर यांनी पडताळणीबाबतची कारवाई दि. १८.०१.२०१८ रोजी थांबवून ती दि. १९.०१.२०१८ रोजी पुन्हा करण्यात येणार असल्याचे मला सांगितले व दि. १९.०१.२०१८ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, मुंबई येथे सकाळी ०९.३० वाजता हजर रहाण्यास सांगितले. त्याप्रमाणे आज लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, येथे पडताळणीच्या पुढील कारवाई करीता लाचेची रक्कम घेवून हजर झालो.

पो.नि.मनोज गुजर यांना मला व पंचांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील गोपनीय कक्षात पुन्हा बोलावून काल दि.१८.०१.२०१८ रोजी वापरण्यात आलेला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये आज

समक्ष

( मनोज गुजर )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

20/1/18

रोजी माझे तसेच पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर पडताळणी कारवाई करीता आवश्यक असलेली साधन सामग्री घेवून पो.नि.गुजर, मी, पंच व पोलीस पथक असे दोन शासकिय वाहनाने पडताळणी कारवाईकरीता मनपा कार्यालय, जी/दक्षिण विभाग, धनमिल नाका, मुंबई येथे जाण्यास निघालो. पो.नि. गुजर यांनी एक शासकीय वाहन पोद्दार रुग्णालय येथे रस्त्यालगत थांबण्यास सागुन दुसरे वाहन कमला मिल कम्पाऊड या ठिकाणी आल्यानंतर पो.नि.मनोज गुजर यांनी पोलीस वाहन नमुद मिलच्या कंम्पाऊडमध्ये पार्किंगमध्ये थांबविण्यास सांगितले. त्यानंतर पो.नि.गुजर यांनी पंच क्र. १ यांना माझे क्लाईट श्री. देवेंद्र शामला यांची भुमीका साकारायची असल्याबाबत सुचना देवून आवश्यक त्या सुचना दिल्या व माझे सोबत ते लोकसेवकास भेटण्याकरीता मनपा कार्यालय, जी/दक्षिण विभाग येथे जाणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि.मनोज गुजर यांनी त्यांच्या ताब्यातील व्हाईस रेकॉर्डर चालु करून माझ्या शर्टच्या आतील बनियनला लावला. त्यानंतर मी व पंच क्र.१ श्री.म्हसाळ असे पडताळणी करीता लोकसेवक यांना भेटण्यासाठी मनपा कार्यालय, जी/दक्षिण विभाग, धनमिल नाका, मुंबई येथील दुसऱ्या माळयावरील दुकाने व आस्थापना या कार्यालयात गेलो. सदर वेळी पंच क्र. १ श्री म्हसाळ हे माझे सोबत होते. त्यावेळी लोकसेवक हे त्यांचे आसनावर नव्हते व त्याचे वरिष्ठ महिला अधिकारी यांचे केबिनमध्ये असल्याचे मला दिसले. म्हणुन तेथील बाजुस असलेल्या इसमास नमुद निरीक्षक यांचे नाव विचारले असता, त्यांनी लोकसेवक अधिकारी यांचे नाव दुकान व अस्थापना निरीक्षक श्री. कामेरकर असल्याचे मला सांगितले. लोकसेवक निरीक्षक श्री. कामेरकर हे त्याचे आसनावर आल्यानंतर मी त्यांना अर्जदार सौ. ममता देवेंद्र शामला हिचे पती श्री. देवेद्र शामला हे त्यांचे सोबत आले असल्याचे सांगुन दुकान व आस्थापना परवाना बाबत विचारणा केली. त्यावेळी लोकसेवक निरीक्षक श्री. कामेरकर यांनी पंच क्र.१ यांना कमला मिल्स येथे लागलेल्या आगीचे उदाहरण देवुन अग्निशामक दलाचा परवाना आवश्यक असल्याचे सांगितले. त्यानंतर नमुद लोकसेवक निरीक्षक यांनी मला व पंच क्र. १ श्री. म्हसाळ यांना त्यांच्या वरिष्ठ निरीक्षक महिला अधिकारी यांना भेटावयास घेवुन गेले. त्यावेळी त्यांचे बोलाण्यातून मला नमुद महिला निरीक्षक अधिकारी यांचे नाव विणा मेस्त्री असल्याचे समजून आले. वरिष्ठ निरीक्षक महिला अधिकारी श्रीमती विणा मेस्त्री यांनी माझेकडे व पंच क्र. १ यांचेकडे दुकान व आस्थापना परवाना करीता आवश्यक असलेल्या कागदपत्रांची विचारणा करुन दुकान व आस्थापना परवाना मंजुर करुन देण्याकरीता ५,०००/- खर्च येईल असे सांगितले.

त्यावेळी मी महिला निरीक्षक अधिकारी श्रीमती. विणा मेस्त्री यांना पंच क्र. १ यांचे समक्ष त्यांना एवढे पैसे देणे शक्य नसल्याचे सांगितले असता, नमुद महिला अधिकारी श्रीमती. विणा मेस्त्री यांनी त्यांच्या हाताच्या बोटांनी रुपये ४,०००/- देणेबाबत इशारा करुन सांगितले. त्यावेळी लोकसेवक निरीक्षक श्री. कामेरकर यांनी महिला अधिकारी श्रीमती. विणा मेस्त्री यांचा इशारा पाहून मला ४,००० रुपयांपेक्षा कमी पैसे घेणार नाही असे सांगून तेवढेच पैसे घेवून येण्यास सांगितले.

त्यावेळी मी नमुद लोकसेवक निरक्षक यांना ए.टी.एम मधून पैसे घेवुन येतो असे सांगुन तेथून निघून गेलो. व ज्या ठिकाणी पालीस पथक शासकिय वाहनसह उभे केले होते, त्या ठिकाणी येवून गाडीत बसलो. पंच क्र. १ हे देखील माझे मागे गाडीजवळ आले. त्यानंतर पो.नि.मनोज गुजर यांनी माझेजवळील व्हाईस रेकार्डर काढून घेतला.

पो.नि.मनोज गुजर यांनी मला घडलेल्या प्रकाराबाबत विचारले असतां, त्यांना मी वरीलप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर पो.नि.मनोज गुजर यांनी पडताळणी दरम्यान माझे व लोकसेवक यांच्यामध्ये झालेले संभाषण पंचासमक्ष ऐकले. लोकसेवक निरीक्षक व त्यांच्या वरीष्ठ महिला अधिकारी

समक्ष

(मनोज गुजर)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

20/1/18

श्री . राकेश शंकरलाल जैन यांचा दि. १९/०१/१८ रोजीचा जबाब पुढे चालू......

यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झालेने सापळा कारवाईचे आयोजन केले. मी लाचेकामी आणलेली रक्कम रूपये ४०००/- ही पो.नि.मनोज गुजर यांच्या ताब्यात दिली. त्यानंतर सदर रक्कमेस गाडीमध्येच मला व पंचाला ॲन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून मी दिलेल्या नोटाला ॲन्थ्रासीन पावडर लावून सदरच्या नोटा पो. नि. मनोज गुजर यांच्या सूचनेवरुन सापळा पथकातील कर्मचाऱ्यांने माझ्या शर्टच्या पुढच्या बाजूच्या डाव्या खिशात ठेवल्या. पोनि मनोज गुजर यांनी मला लोकसेवक जोपर्यंत लाचेची रक्कम मागत नाही तोपर्यंत नोटाला हात न लावण्याची सूचना दिली. त्यानंतर पोनि मनोज गुजर यांच्या सूचनेवरुन मी व पंच म्हसाळ असे पुन्हा लोकसेवक यांना भेटण्यासाठी मनपा कार्यालय, जी/दक्षिण विभाग, धनमिल नाका, मुंबई येथील कार्यालयात दुसऱ्या माळयावर दुकाने व आस्थापना विभाग येथे गेलो. त्यावेळी सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी हे माझ्या मागोमाग आले. पंच म्हसाळ हे माझे सोबत होते. त्यावेळी लोकसेवक यांनी मला पैसे आणले का ? असे विचारून पुन्हा लाचेची मागणी केली. त्यामुळे मी त्यांना सदर लाचेची रक्कम रू. ४०००/- देवु केली असता, त्यानी त्यांचेकडे असलेली सुटकेस उघडून नमुद सुटकेस मध्ये लाचेची रक्कम ठेवण्यास सांगितली. त्यावेळी मी लोकसेवक यांचे सुटकेसमध्ये लाचेची रक्कम ठेवत असताना ती विखरुन ठेवली. त्यामुळे लोकसेवक यानी लाचेची रक्कम एकत्र करुन ती सुटकेसच्या कप्प्यात ठेवली आणि सुटकेस बंद करुन जेवण करण्यास निघुन गेला. त्यानंतर ठरल्याप्रमाणे मी इशारा केल्यावर सापळा पथकाने लोकसेवक यांना ताब्यात घेतले.

तरी बृहन्मुंबई महानगरपालीका कार्यालय, जी/दक्षिण विभाग, दुकाने व आस्थपना विभाग, दुसरा माळा, धनमिल नाका, मुंबई येथील लोकसेवक निरीक्षक संदिप कमलाकर कामेरकर व वरिष्ठ निरीक्षक श्रीमती विना विजय मेस्त्री यानी घरगुती खानावळ करीता लागणारे दुकान व आस्थापना गुमस्ता परवाना मंजुर करुन देण्याबाबत माझ्याकडे रूपये ४,०००/- लाचेची मागणी करून लोकसेवक निरीक्षक संदिप कमलाकर कामेरकर यांनी रूपये ४०००/- स्वत:चे फायदयाकरीता कायदेशिर परिश्रमाखेरीज पारितोषण म्हणून स्विकारले म्हणून व वरिष्ठ निरीक्षक श्रीमती विना विजय मेस्त्री स्वत:चे फायदयाकरीता कायदेशिर परिश्रमाखेरीज पारितोषण म्हणून स्विकारण्याचे मान्य केले म्हणून माझी त्यांचेविरुध्द तक्रार आहे.

माझ्यात व लोकसेवक निरीक्षक संदिप कमलाकर कामेरकर व वरिष्ठ निरीक्षक श्रीमती विना विजय मेस्त्री यांच्यामध्ये कोणताही अर्थिक व्यवहार नसून, कोणतेही पूर्ववैमनस्य नाही.

माझा जबाब मराठीत संगणकावर टंकलिखित केला असून तो मला हिंदीत समजावून सांगितला तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

( मनोज गुजर )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई.

20/11/2018